सावदा पो.स्टे.जि. जळगाव (महाराष्ट्र) पोलीस निरीक्षक

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** सावदा **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0212 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/11/2022 15:50 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 30/08/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/08/2022
**Time From (वेळेपासून):** 12:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/11/2022 **Time (वेळ):** 15:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 016 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/11/2022 15:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सावदा,रावेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संजय मोतीलाल कुमावत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | हरी विठ्ठल नगर,खंडेराव पुलाजवळ,जळगाव ,जळगाव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | हरी विठ्ठल नगर,खंडेराव पुलाजवळ,जळगाव ,जळगाव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9595953258

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | समाधान रामकष्ण गायकवाड | | | 1. स्वामी नारायण नगर,सावदा,रावेर, सावदा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | देविदास दादाराव इंगोले | | | 1. सरकारी निवासस्थान,सावदा,रावेर, सावदा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गुन्हयाची थोडक्यात हकिगत-यातील फिर्यादी याचा मुलगा आकाश कुमावत यांचे विरुध्द सावदा पोलीस स्टेशन येथे गु.र न 136/2022भा.द. वि कलम 363,376(2)(N),पोस्को कायदा कलम 4अन्वये गुन्हा दाखल आहे.सदर गुन्हयाचा तपास पोउपनिरी/गायकवाड यांचे कडे असुन सदर गुन्हयात फिर्यादीच्या मुलास दि 27/08/2022रोजी अटक केली होती.त्यानंतर फिर्यादी हे दि 27/08/2022रोजी सावदा पोलीस स्टेश येथे मुलास भेटण्यासाठी गेले असता त्यावेळी तपास अधिकारी पोउपनिरी-गायकवाड यांनी फिर्यादीस एका बाजुस घेवुन सांगितले की तुमचा मुलगा व यातील पिडीत मुलगी नंदिनी ही तुमच्या घरी व तसेच तुमच्या नातेवाईकाकडे थांबली होती त्यामुळे त्यांना देखिल आरोपी करतो असे सांगुन सदर गुन्हयात फिर्यादी व त्यांचे नातेवाईक अशांना आरोपी न करण्यासाठी तसेच गुन्हयात मुलाला योग्य ती मदत करण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांचे कडेस 60,000/ -रुपये मागणी केली.त्याबाबत फिर्यादी यांनी दि 30/08/2022रोजी अँन्टी करप्शन ब्युरो ,जळगाव कार्यालय येथे तक्रार दिली होती.सदर तक्रारीची अँ◌टी करप्शन ब्युरो,जळगाव पथकाने दि 30/08/2022रोजी पंचा समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी क्र 1यांनी सावदा पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयात फिर्यादी व त्याचे नातेवाईक यांना गुन्हयात आरोपी न करण्यासाठी तसेच गुन्हयात मुलाला योग्य ती मदत करण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांचे कडेस प्रथम 60,000/-रुपये व तडजोडी अंती 15,000/-रुपये लाच रकमेची मागणी करुन सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला तसेच आरोपी क्र 1यांच्या लाच रकमेच्या मागणीस आरोपी क्र 2यांनी प्रोत्साहन दिले म्हणुन गुन्हा. सोबत संगणीकृत केलेली फिर्याद जोडली आहे.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): Mamta Rehman Tadavi
**Rank** (पद): HC (Head Constable)
**No.**(क्र.): 2476 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

शेवटन हुसातर

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): devidas dadarao ingole
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
सावदा पोलीस स्टेशन

फिर्याद

सावदा पोलीस स्टेशन
दिनांक. ०१.११.२०२२

**मी संजय मोतीलाल कुमावत, वय–४२ वर्ष, व्यवसाय–टि.व्ही.केबल जोडणी, रा.हरी विठ्ठल नगर,खंडेराव पुलाजवळ, जळगांव ता.जि.जळगांव.**

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी दि ३०.०८..२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय जळगांव येथे हजर राहुन पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांचेकडेस पोलीस उप निरीक्षक श्री.गायकवाड सावदा पोलीस स्टेशन यांचे विरुध्द लाचेसंबधी तक्रार दिली होती ती खालील प्रमाणे

मी वर नमुद पत्त्यावर माझे आई–वडील, पत्नी व तीन मुलांसह रहावयास आहे. माझ्या तीन मुलांपैकी मोठा मुलगा नामे भुषण कुमावत जळगांव शहरात रिक्षा चालवतो. दुसरा मुलगा आकाश कुमावत हा मला माझ्या जळगांव शहरातील केबलच्या जोडणीच्या व्यवसायात मदत करतो व तिसरा मुलगा नामे अंकुश कुमावत हा शिक्षण घेत आहे.

माझा दोन नंबरचा मुलगा नामे आकाश कुमावत हा माहे जुलै २०२२ मध्ये नंदिनी रामदास मिस्तरी, रा.खिरोदा,ता.रावेर जि. जळगांव हिला घेऊन कोठेतरी निघुन गेला होता. तो आमच्या घरी मुलीसह ऑगष्ट २०२२ मध्ये आला होता. मुलासोबत आलेली नंदिनी मिस्तरी हिच्या वडीलांनी त्यांची मुलगी मिळुन न आल्याने दि.२४/०७/२०२२ रोजी सावदा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे सदर गुन्ह्यात माझा मुलगा आकाश यास सावदा पोलीस स्टेशन येथील गुन्हा रजिष्ट नंबर १३६/२०२२, भा.द.वि. कलम–३६३,३७६(२), (एन) पोस्को कायदा कलम ४ अन्वये दाखल गुन्ह्यात दि.२७/०८/२०२२ रोजी अटक करण्यात आली.

त्यामुळे दि.२७/०८/२०२२ रोजी मी मुलास भेटण्यासाठी सावदा पोलीस स्टेशन येथे जावुन सदर गुन्ह्याचे तपास अधिकारी पो.उप.निरीक्षक श्री.गायकवाड यांना भेटलो असता त्यांनी मला एका बाजुला घेवुन जावून सांगितले की, सदर गुन्ह्याचा तपास मी करीत आहे. या गुन्ह्याच्या तपासामध्ये तुम्ही स्वत: मुलाचे वडील म्हणुन, तसेच तुमची पत्नी व भाऊ तसेच तुमचा मुलगा तुमची कल्याण येथे राहत असलेली बहिण संगिता कुमावत हिच्या घरी थांबला होता म्हणुन संगिता असे एकुण चार लोक अजून या गुन्ह्यात आरोपी होतील. तुम्हाला जर या गुन्ह्यात आरोपी व्हायचे नसेल,तर तुम्हाला मला ६०,०००/–रुपये द्यावे लागतील. तरचं मी तुम्हाला आरोपी करणार नाही व तुमच्या मुलाला देखील सदर गुन्ह्यात योग्य ती मदत करेल असे सांगितले. तेव्हा माझ्या लक्षात आले की पोलीस उप निरीक्षक गायकवाड हे माझ्याकडे मला,माझी पत्नी,भाऊ व माझी बहिण अशांना आरोपी न करण्याच्या मोबदल्यात माझेकडेस ६०,०००/– रुपये लाचेची मागणी करत आहेत. तेव्हा मी त्यांना आता माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगुन निघुन आलो.

मला पोलीस उप निरीक्षक गायकवाड यांना मी,माझी पत्नी,भाऊ व माझी बहिण हिला आरोपी न करण्याच्या मोबदल्यात ६०,०००/– रुपये लाचेची रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही.परंतु जर मी पैसे दिले नाही तर ते आम्हा चौघांना आरोपी करतील म्हणुन मी त्यांचे विरुद्ध तक्रार देत आहे व पोलीस उप निरीक्षक गायकवाड यांनी सांगितल्या प्रमाणे मी आज दि.३०/०८/२०२२ रोजी माझे नातेवाईक संदिप कुमावत यांच्यासह पो.उप.निरीक्षक श्री.गायकवाड यांची भेट घेण्यासाठी सावदा पोलीस स्टेशन येथे जाणार आहे. त्यासंदर्भात मी दि.३०.०८.२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

त्यानंतर पाटील साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही मी सांगितल्याप्रमाणे सावदा ते पिंपरुड रोडवर सावदा गावाच्या अलीकडे जाऊन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला माझे मोटार सायकलवर पुढे रवाना करून सदर ठिकाणी थांबण्यास सांगितले.त्याप्रमाणे मी माझे मोटार सायकलने ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयातुन रवाना झालो. त्यानंतर पाटील साहेब,शासकीय पंच व सापळा पथक असे मी सांगितल्या ठिकाणी खाजगी वाहनाने आले. त्यानंतर मी पाटील साहेबांना सांगितले की, माझे बरोबर माझा नातेवाईक संदीप कुमावत हा देखिल आला असल्याचे सांगितले.त्यानंतर पाटील साहेब यांच्या सुचनेवरुन पोकॉ ईश्वर धनगर यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले.त्यानंतर पाटील साहेब यांनी मला, माझे नातेवाईक व पंच क्र.०१ यांना महत्वाच्या सुचना दिल्या.

त्यानंतर पाटील साहेब यांचे सुचनेवरुन पोकॉ/ईश्वर धनगर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे बनियनच्या आत गळयात दोरीने लटकावुन दिले. त्यानंतर मला, माझा नातेवाईक व पंच क्रं.१ यांचेसह माझे मोटर सायकलने पोउनि श्री.गायकवाड यांच्याशी लाचे संबधी बोलणी करण्यासाठी सावदा पोलीस स्टेशन येथे दि.३०.०८.२०२२ रोजी १२.४५ वाजता रवाना केले. त्यावेळी सापळा पथक व पंच क्र.०२ असे खाजगी वाहनाजवळ थांबुन होते.

त्यानंतर १३.३८ वाजता मी, माझा नातेवाईक व पंच क्रं. १ असे मोटार सायकलने सावदा ते पिंपरूड रोडवर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेव्हा पाटील साहेब यांचे सुचनेवरुन पोकॉ ईश्वर धनगर यांनी माझे कडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी पंच क्रं.१ यांना सापळा पथकापासुन रवाना केल्यानंतरची घडलेली हकीगत विचारली असता त्यांनी "मी, तक्रारदार व त्यांचा नातेवाईक असे सावदा पोलीस स्टेशन येथे गेलो. तेव्हा पोलीस स्टेशनमध्ये गायकवाड हे दिसुन आले नाही म्हणुन तक्रारदार यांनी तेथिल पोलीस कर्मचारी यांना गायकवाड साहेब कोठे गेले असे विचारले. तेव्हा पोलीस कर्मचारी यांनी साहेब बाहेर गेलेले आहेत येतील थोड्या वेळात. त्यानंतर तक्रारदार यांनी फोनवरुन गायकवाड यांना फोन केला. तेव्हा गायकवाड यांनी मी पाच ते दहा मिनीटांमध्ये येतो असे सांगुन थांबण्यास सांगितले. त्यानंतर बराच वेळ झाल्यावर देखील गायकवाड हे न आल्याने तक्रारदार यांनी पुन्हा गायकवाड यांना फोन लावला त्यावेळी गायकवाड यांनी काका मी आलो दोनचं मिनीटांत पोहचतोयं असे सांगितले. त्यानंतर थोड्या वेळात गायकवाड हे पोलीस स्टेशनला आले. त्यानंतर गायकवाड हे सपोनि श्री.इंगोले यांचेजवळ जाऊन थांबले. तेव्हा मी, तक्रारदार व त्यांचा नातेवाईक असे त्यांच्याजवळ जाऊन थांबलो. स.पो.नि.श्री.इंगोले यांचे व पोउनि/गायकवाड यांचे बोलणे झाले. सदरवेळी सपोनि श्री.इंगोले यांचे तक्रारदार यांचेशी त्यांचे मुलावर दाखल असलेल्या गुन्ह्याच्या संदर्भात चर्चा झाली.

01-11-2022

संजयकुमावत

त्यानंतर सपोनि श्री.इंगोले हे तक्रारदाराशी बोलत असतांना मध्येच गायकवाड यांनी सांगितले पाच आरोपी बनत होते. तेव्हा श्री.इंगोले यांनी गायकवाड यांच्या बोलण्याला प्रोत्साहन दिले व तक्रारदार यांना सांगितले. पाच आरोपी बनत होते,तेवढं सांभाळ बाबा आता, आम्ही म्हणतं नाही, तेवढ मॅनेज करा, नाहीतर त्याला पोस्को लागलायं साहेबांना भेटा, चला ठिक हे असे सांगितले. त्यानंतर गायकवाड हे मला व तक्रारदार व त्याचा नातेवाईक यांना एका कक्षात घेवुन गेले व तेथे तक्रारदार व गायकवाड यांचेमध्ये गुन्ह्याबाबत चर्चा सुरु झाली. तेव्हा गायकवाड यानी तक्रारदार यांना वकील लावा चांगला मी सांगतो त्या पद्धतीने करा जामीन होवुन जाईल डायरेक सेम डे ला, त्यानंतर गायकवाड यांनी किती आणलेय? फायनल करुन टाका असे सांगुन त्यांचे मोबाईल मध्ये ६०,०००/–रुपये असे अंक टाईप करुन दाखविले. तेव्हा तक्रारदार यांनी नाही हो सर साठ हजार, तेव्हा तक्रारदार यांनी सर १५,०००/–रुपये असे सांगितले. त्यावर गायकवाड यांनी तक्रारदार याना किती वेळ लागेल, ठिक हे, असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी एक घंटा, आम्ही तोपर्यंत घेवुन तुम्हाला कॉल करु का डायरेक येवू असे सांगितले असता गायकवाड यांनी ठिक हे तुम्ही काही टेंन्शन घेवू नका, असे सांगुन तक्रारदार यांचे कडे प्रथम ६०,०००/– रूपये नंतर तडजोडीअंती १५,०००/–रूपये लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी तक्रारदार यांना घडलेली हकिगत विचारली असता तक्रारदारांनी मी पंच क्रं.१ म्हणुन जशी हकीगत सांगितली त्याप्रमाणे हकिगत सांगितली.

त्यानंतर पाटील साहेब व दोन्ही पंचानी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये माझे व पोउनि गायकवाड व सपोनि इंगोले यांचेत झालेले संभाषण ऐकले. त्या संभाषणावरून तेव्हा पोउनि गायकवाड यांनी माझे कडेस तडजोडीअंती १५,०००/–रु.लाचेची मागणी केली. तसेच सपोनि इंगोले यांनी सदर लाच मागणी करण्यास प्रोत्साहन दिलेबाबत खात्री झाली. त्यानंतर पाटील साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे एकत्रितरित्या करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सापळापुर्व कामी अँथ्रासिन पावडर नोटांना लावण्याचे प्रात्यक्षिक करण्याचे ठरविले.त्यानंतर मी माझे घर खर्चातुन हजर केलेली लाचेची रक्कम ३,०००/–रु.त्यात ५००/–रु.दराच्या ०६ चलनी नोटां तसेच शासकिय २,०००/–रु. दरांच्या ०६ नकली नोटा असे १२,०००/–रूपये असे एकुण १५,०००/–रूपयांना अँथ्रासिन पावडर लावुन सदर लाचेची रक्कम माझे शर्टच्या खिश्यात ठेवुन दिली होती.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ यांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टच्या आतुन गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, माझा नातेवाईक व पंच क्र.१ यांचेसह १५,०००/–रु.लाचेची रक्कम घेवुन पोउनि गायकवाड यांना देण्यासाठी सावदा पोलीस स्टेशन येथे माझे मोटार सायलकने १५.४४ वाजता रवाना केले होते.

त्यानंतर १६.१० वा. मी व माझा नातेवाईक तसेच पंच क्र.०१ अशांनी सापळा पथकास कोणत्याही प्रकारचा इशारा न करता सावदा पोलीस स्टेशनमधुन बाहेर येवुन सावदा ते पिंपरूड रोडवर जावुन थांबलो. आमचे मागोमाग सापळा पथक देखील आले. तेव्हा पाटील साहेब यांनी माझे कडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले व पंच क्रं.१ यांना सापळा पथकापासुन रवाना केल्या नंतरची घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी मी व तक्रारदार त्यांचा नातेवाईक संदिप कुमावत असे मोटर सायकलीने निघुन सावदा पोलीस स्टेशनच्या आत गेलो. तेथे तक्रारदार यांनी गायकवाड यांचा शोध घेतला असता ते दिसुन आले नाही. तेव्हा तक्रारदार यांनी सावदा पोस्टे मधील पोलीस महिला कर्मचारी यांना गायकवाड साहेब किती वाजता येतीन असे विचारले असता महिला कर्मचारी यांनी संध्याकाळी येतील बहुतेक असे सांगितले. त्यानंतर मी, तक्रारदार व त्यांचा नातेवाईक असे पोलीस स्टेशनच्या आवारात थांबुन होतो. बराच वेळ झाल्यावरही गायकवाड हे न आल्याने तक्रारदार यांनी गायकवाड यांना फोन केला असता गायकवाड यांचा फोन व्यस्त येत होता.त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांनी गायकवाड यांना फोन केला असता त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही. त्यानंतर मी, तक्रारदार व त्यांचा नातेवाईक असे पोलीस स्टेशनच्या आवारात असतांना सपोनि इंगोले यांनी तक्रारदार यांना काय झाल नाही का रे तुमच काम, जा न घरी, आता थांबु नका झाल तुमचं काम थांबु नका, बंदोबस्तावर असेल ते कशाला थांबता तुम्ही साहेब, जा ना उगीच कशाला आम्हाला बंदोंबस्त काम करु द्या, घरी जा फालतु धंदे नी कऱ्याचे चला निघा असे सांगितले. असल्याची हकीगत कथन केली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला घडलेली हकिगत विचारली असता मी पंच क्रं.१ यांच्या सांगण्याप्रमाणे मिळती जुळती हकिगत सांगितली.

सदर कार्यवाहीअंती माझी व पोउनि गायकवाड यांची भेट झाली नाही. व गायकवाड यांनी माझा फोन उचलला नाही. तसेच डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकुन तक्रारदार यांना सपोनि इंगोले यांनी तक्रारदार यांना काय झाल नाही का रे तुमच काम, जा न घरी, आता थांबु नका, झाल तुमचं काम थांबु नका, बंदोबस्तावर असेल ते कशाला थांबता तुम्ही साहेब, जा ना उगीच कशाला आम्हाला बंदोंबस्त काम करु द्या, घरी जा फालतु धंदे नी कऱ्याचे चला निघा असे सांगितल्याची पाटील साहेबांची खात्री झाल्याने सदर सापळा कारवाई स्थगित केली. त्यानंतर पाटील साहेबांनी माझे कडील १५,०००/–रु.लाचेची रक्कम त्यात ३,०००/–रूपये चलनी नोटा व १२,०००/– रूपये नकली नोटा पुढील कारवाईसाठी ताब्यात घेवुन सापळा कारवाई पुर्ण केली. त्यानंतर पाटील साहेबांनी पुढील सापळा कार्यवाही पोउनि गायकवाड यांचा मला ज्या दिवशी फोन येईल त्या दिवशी करण्याचा निर्णय घेवुन मला व दोन्ही पंचाना गोपनियता राखण्याच्या सुचना दिल्या होत्या. तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

त्यानंतर मी दि.०५.०९.२०२२ रोजी लाप्रवि, जळगांव कार्यालयात हजर राहुन पाटील साहेबांना मी पोउनि गायकवाड यांना फोन करणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पाटील साहेब, दोन पंच व सापळा पथक असे दि.०५.०९.२०२२ रोजी सापळा कारवाई साठी लागणारे साहीत्यासह जळगांव शहरातील आयएमआर कॉलेज जवळ गेलो होते.तेथे पाटील साहेबांनी पुढील सापळा कारवाई सुरु करून मला व पंच क्रं. १ यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेबांनी मला पोउनि गायकवाड हे कुठे भेटतील असे विचारण्यास सांगितले.तेव्हा मी माझे मोबाईल फोनवर पोउनि गायकवाड यांना फोन लावुन स्पिकर चालु केला. तेव्हा पोउनि.गायकवाड त्याचा एमसीआर झालेला आहे, तुम्ही वकील लावुन घ्या आमच्यासाठी काही काम नाही राहीलयं, तिकडनं बेल करु शकता आमच्याकडे

01.11.2022

संजय कुमावत

कुठलेही काम पेंडींग नाही, कुठल्या पैशाचं तुमचा गैरसमज आहे की,पोलीसांना पैसे दिले की आरोपीचा बेल होईल, ते तुमच्या मनातुन काढून टाका, अरे काका तुम्ही वेड्यासारख काय करताय, पैशाचं काय संबंध हे, काका तुम्ही बळजबरी लागलेय मागे, पोलीस नाही सोडु शकत नाही. कोणाला तुम्हाला एक रुपया द्यायची गरज नाही, पोलीसांकडे तुमच काही काम शिल्लक राहीलेलं नाही असे सांगितले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला घडलेली हकीगत विचारली असता मी वर प्रमाण हकीगत सांगितली.तसेच त्यांनी पोउनि गायकवाड यांनी मला तुम्हाला एक रुपया द्यायची गरज नाही, पोलीसांकडे तुमच काही काम शिल्लक राहीलेलं नाही असे सांगितले. पोउनि गायकवाड यांच्या असे बोलण्यावरून त्यांना माझे विषयी संशय आलेला असावा. एकंदरीत पोउनि गायकवाड यांनी मला तुम्हाला एक रुपया द्यायची गरज नाही,पोलीसांकडे तुमच काही काम शिल्लक राहीलेलं नाही असे सांगितल्याने पोउनि गायकवाड हे आता माझेकडून लाचेची रक्कम स्विकारतील असे वाटत नाही.त्यानंतर पाटील साहेब यांनी पंचासमक्ष माझे ३,०००/–रु. नोटा बदलवुन मला परत दिले. तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर मी दि.०५.०९.२०२२ रोजी पोउनि गायकवाड यांनी माझे जवळुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. तसेच ते आता यापुढे देखिल माझेकडुन लाचेची रक्कम स्किारतील असे मला वाटत नाही. त्यांचे बोलण्यावरुन त्यांना माझे विषयी संशय आला असावा म्हणुन त्यांनी लाच रक्कम घेतली नाही. तरी त्यांचेवर पुढील योग्य ती कार्यवाही व्हावी बाबत जबाब दिला आहे.

त्या अनुषंगाने आज दि.०१.११.२०२२ रोजी मला अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात बोलाविण्यात आले. त्यानंतर मी, श्री.पाटील साहेब, दोन शासकीय पंच व सापळा पथक असे आम्ही सावदा पोलीस स्टेशन येथे गेलो. तेव्हा मी पोलीस स्टेशनमध्ये असलेले सपोनि इंगोले व पोउनि गायकवाड हे हजर असल्याचे पाटील साहेब यांना सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी सपोनि इंगोले व पोउनि गायकवाड यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगुन सपोनि इंगोले व पोउनि गायकवाड यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पाटील साहेब यांनी प्रथम पोउनि/ गायकवाड यांना त्यांचे पुर्ण नाव,गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव समाधान रामकृष्ण गायकवाड,वय ३१ वर्ष, व्यवसाय– नोकरी, पोलीस उप निरिक्षक,सावदा पोलीस स्टेशन,ता.रावेर,जि.जळगाव ह.मु.स्वामी नारायण नगर,सावदा,ता.रावेर,जि.जळगाव. मुळ रा.उसवाड,ता.चांदवड,जि.नाशिक. (खाते पोलीस – वर्ग २) असे सांगितले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सपोनि/इंगोले यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव देविदास दादाराव इंगोले,वय ५५ वर्ष, व्यवसाय– नोकरी, सहायक पोलीस निरिक्षक,सावदा पोलीस स्टेशन,ता.रावेर,जि.जळगाव मुळ रा. मुक्काम मलकापुर,पोस्ट–हनतोडा,ता.अंजनगाव सुर्जी,जि.अमरावती.(खाते पोलीस – वर्ग २) असे सांगितले.त्यानंतर पाटील साहेब यांनी पोउनि/ गायकवाड व सपोनि/इंगोले यांना ताब्यात घेतले आहे.

तरी पोउनि.गायकवाड यांनी दि.३०.०८.२०२२ रोजी १२.४५ ते १३.३८ वा.चे दरम्यान सावदा पोलीस स्टेशन येथे पंच क्र. ०१ यांचे समक्ष माझ्या मुलाविरूध्द सावदा पोलीस स्टेशन गुरन १३६/२०२२,भा.द.वि. कलम ३६३, ३७६ (२), (एन) पोस्को कायदा कलम ४ अन्वये दाखल असलेल्या गुन्हयात मला व माझी पत्नी, बहीण,मुलगा यांना आरोपी न करण्याचे मोबदल्यात तसेच गुन्ह्यात योग्य ती मदत करण्यासाठी माझेकडे प्रथम ६०,०००/– रुपये व तडजोडीअंती १५,०००/–रुपये लाच रकमेची मागणी करुन सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच सपोनि इंगोले यांनी पोउनि गायकवाड यांच्या बोलण्याला प्रोत्सहन दिले.

अशा प्रकारे पोउनि.गायकवाड यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन स्वत:च्या आर्थिक फायाद्यासाठी माझेकडेस प्रथम ६०,०००/– रूपये व तडजोडीअंती १५,०००/–रु. लाच रक्कमेची मागणी केली व सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेच सपोनि इंगोले यांनी पोउनि गायकवाड यांना लाच मागणीस प्रोत्साहन दिले म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मला वाचुन दाखविण्यात आली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. ती अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयातील संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**फिर्याद देणा–याची सही**
**दि. ०१.११.२०२२**

**समक्ष**

01.11.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**